**<u>ठळक बातम्या</u>**

- सन २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकचं यजमानपद मिळवण्यासाठी भारत जोरदार प्रयत्न करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- व्हेनेझुएलातल्या अमेरिकेच्या कारवाईवर चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदची उद्या आपत्कालीन बैठक बोलावली

- महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकांमधे बिनविरोध निवड झालेल्या ठिकाणी पुन्हा निवडणूक घ्यावी अशी उद्धव ठाकरे यांची मागणी

- भारतीय कृषी संशोधन परिषदेनं विकसित केलेल्या २५ पिकांच्या १८४ सुधारित वाणांचं केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**आणि**

- ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप

**<><><><><>**

सन २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकचं यजमानपद मिळवण्याकरता भारत जोरदार प्रयत्न करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. उत्तर प्रदेशात वाराणसी इथं होत असलेल्या ७२ व्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांचं उद्घाटन त्यांनी आज दूरस्थ पद्धतीनं केलं, त्यावेळी ते बोलत होते. २०१४ नंतर विविध क्रीडा प्रकारांमध्ये भारताची कामगिरी सातत्याने सुधारली आहे. राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा आणि खेलो भारत धोरण २०२५ यांच्या माध्यमातून सरकारनं क्रीडा क्षेत्रात अनेक बदल आणि सुधारणा केल्यामुळे खेळाडूंच्या यशात लक्षणीय वाढ झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

आजपासून ११ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या आठ दिवसांच्या स्पर्धेत देशभरातून ५८ संघांमधले एक हजारांहून अधिक खेळाडू सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

व्हेनेझुएला मधल्या अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांवर चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदनं उद्या, सोमवारी आपत्कालीन बैठक बोलावली आहे. कोलंबियाच्या

विनंतीवरून ही बैठक बोलावली असून, त्याला चीन आणि रशिया, या स्थायी सदस्य देशांनी पाठिंबा दर्शवला आहे.

व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना काल अमेरिकेनं अटक केली असून, त्यानंतर व्हेनेझुएलामध्ये केलेल्या हवाई हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा परिषदेनं हा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, व्हेनेझुएलाचे अध्यक्ष आणि त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांच्यावर न्यू यॉर्क इथल्या न्यायालयात आरोप निश्चित करण्यात आल्याचं अमेरिकेचे अॅटर्नी जनरल पाम बोंडी यांनी म्हटलं आहे. अमेरिके विरोधात नार्को-दहशतवादाचा कट रचल्याचा, तसंच विध्वंसक उपकरणं बाळगण्याचा त्यांच्यावर आरोप असून, त्यांच्यावर उद्या खटला चालवला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

अमेरिकेच्या या कारवाईबद्दल संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी चिंता व्यक्त केली असून, हे आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन असल्याचं म्हटलं आहे. अमेरिकेतला डेमोक्रॅटिक्स पक्ष, आणि अमेरिकेसह विविध देशांच्या माध्यम संस्थांनी अमेरिकन लष्कराच्या या कारवाईबद्दल चिंता व्यक्त केली असून, हे कायद्याचं उल्लंघन असल्याचं म्हटलं आहे. व्हेनेझुएलामधल्या कारवाईबद्दल निषेध नोंदवण्यासाठी अमेरिकेतल्या वॉशिंग्टन, बोस्टन, लॉस एंजेलिस, अटलांटा, शिकागो आणि मियामी यासारख्या शहरांमधे नागरिकांनी काल रस्त्यावर उतरून निदर्शनं केली.

रशिया, चीन, इराण, ब्राझील आणि क्युबासह अनेक देशांनी अमेरिकेच्या लष्करी कारवाईचा निषेध केला असून, हे व्हेनेझुएलाच्या सार्वभौमत्वाचं आणि प्रादेशिक अखंडतेचं उल्लंघन असल्याचं म्हटलं आहे. युरोपियन युनियन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत असून, आंतरराष्ट्रीय कायदा आणि संयुक्त राष्ट्रांची सनद, याचा आदर करण्यावर युरोपियन युनियनचे परराष्ट्र धोरण प्रमुख काजा कल्लास यांनी भर दिला आहे.

भारतानंही याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या संपूर्ण परिस्थितीवर आपण लक्ष ठेवत असून, व्हेनेझुएलाच्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी आपलं पूर्ण सहकार्य असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

व्हेनेझुएलामधल्या घडामोडींवर आपण लक्ष ठेवून असल्याचं पोप लियो यांनी म्हटलं आहे. कुठल्याही देशाच्या सार्वभौमत्वाचं रक्षण करायला हवं असं त्यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, व्हेनेझुएलाच्या सर्वोच्च न्यायालयाने उपाध्यक्ष  डेल्सी रॉड्रिग्ज यांना देशाच्या हंगामी अध्यक्ष  म्हणून पदभार स्वीकारण्याचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी प्रचाराला आता जोर आला आहे. या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून गेल्याबद्दल विरोधी पक्षांनी न्यायालयात धाव घेतली तरी जनादेश महायुतीच्या बाजूनंच असेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते चंद्रपूर मधे प्रचार रॅलीत वार्ताहरांशी बोलत होते. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी अमरावती इथं रोड शो केला तसंच अकोला इथं प्रचारसभा घेतली. केंद्र सरकारने कोट्यवधी रुपयांचा निधी शहरांच्या विकासासाठी उपलब्ध करून दिल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**विकसित** महाराष्ट्रासाठी जनता महायुतीला मतदान करेल असा विश्वास भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात व्यक्त केला.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचा जाहीरनामा आज प्रसिद्ध झाला. राज आणि उद्धव ठाकरे यांनी मुंबईत शिवसेना भवन इथं हा जाहीरनामा प्रसिद्ध करताना वार्ताहरांशी संवाद साधला. राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या बिनविरोध निवडणुकीला यावेळी दोन्ही नेत्यांनी विरोध केला. बिनविरोध निवडणूक होणं हा लोकशाहीचा आणि लोकांचा अपमान आहे, मतदारांना मतदानापासून वंचित ठेवलं जात आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. ज्या ठिकाणी विरोधी उमेदवार नाहीत तिथली प्रक्रिया रद्द करून पुन्हा एकदा निवडणूक प्रक्रिया राबवावी अशी मागणी त्यांनी केली.

**होल्ड बाईट उद्धव**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे संवैधानिक पदावर असूनही विरोधकांना दमदाटी करत आहेत, सत्ताधारी पक्षाचा प्रचार करत आहेत, त्यामुळे त्यांना निलंबित करावं अशी मागणीही उद्धव ठाकरे यांनी केली.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही बिनविरोध निवडीला विरोध केला. भाजपा चुकीचे पायंडे पाडत असून जनतेनं याचा विचार करायला हवा, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

२०२५ या वर्षात देशात १५ कोटी टनांपेक्षा जास्त तांदूळ उत्पादन झाल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. ICAR, अर्थात भारतीय कृषी संशोधन परिषदेनं विकसित केलेल्या २५ पिकांच्या १८४ सुधारित वाणांचं शिवराजसिंह यांनी आज लोकार्पण केलं. त्यावेळी ते बोलत होते. तांदूळ उत्पादनात भारतानं चीनला मागे टाकलं असून, भारत हा जगातला आघाडीचा तांदूळ निर्यातदार देश बनल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

सातारा इथं आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप आज झाला. ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त गुजराती लेखक रघुवीर चौधरी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यक्रमाला उपस्थित होते. मराठी भाषेच्या संवर्धन जतनासाठी कधीही निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली. मराठी पुस्तकांच्या दुकानांसाठी एस टी महामंडळाच्या आवारात ५० टक्के सवलतीच्या दरात जागा उपलब्ध करुन देण्याचा, तसंच अत्याधुनिक ग्रंथालयं उभारण्याचा निर्णय लौकरच होईल, असं आश्वासन शिंदे यांनी दिलं.

ग्रामीण भागातल्या साहित्यिकांचं साहित्य इतर भाषांमधे अनुवादित करण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांच्या नावानं समिती कार्यान्वित करण्याची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आपल्या भाषणात केली.

यापुढचं म्हणजेच शतकपूर्ती संमेलन पुण्यात होईल, असं महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांनी जाहीर केलं.

**<><><><><>**

विकसित भारत जी रामजी योजना पूर्वीच्या मनरेगा योजनेच्या तुलनेत अधिक पारदर्शक आणि कल्याणकारी असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान आंनी आज सांगितलं. या योजनेबद्दल काँग्रेस जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. काँग्रेसनं नव्या योजनेतला फरक समजून घ्यावा आणि संभ्रम निर्माण करणं थांबवावं, असं आवाहन त्यांनी केलं,.....

- **- होल्ड- बाईट- शिवराज सिंग चौहान - -**

नव्या जीरामजी योजनेबद्दल धाराशिव जिल्ह्यातले शेतकरी रोहित कांबळे यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रीया दिली…

**होल्ड बाईट रोहित कांबळे-**

**<><><><><>**

गेलं वर्ष हे विविध क्षेत्रांप्रमाणेच राजकीय क्षेत्रासाठीही वेगळं वर्षं ठरलं. जागतिक स्तरावर भारताच्या उदयाचा निर्णायक अध्याय म्हणून या वर्षाकडे पाहिलं जाईल. आर्थिक अनिश्चितता, भूराजकीय उलथापालथ आणि सत्तेच्या बदलत्या समीकरणांच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये स्थैर्य देणारं व्यक्तिमत्व म्हणून उदयाला आले. याविषयी आता सविस्तर ऐकुया…

**- व्हीसी -**

*(गेल्या वर्षी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संसदीय मुत्सद्देगिरी वेगळ्या उंचीवर गेली. घाना, त्रिनिदाद, टोबॅगो, नामिबिया या देशांच्या संसदेत त्यांनी विकसनशील जगाच्या उदयाविषयी सांगितलं. इथियोपिया संसदेच्या संयुक्त अधिवेशनातही त्यांनी आपले विचार प्रकट केले. त्यांच्या या विचारांमुळेच ग्लोबल साउथसाठी भारत हा एक आधारस्तंभ बनल्याची भावना दृढ झाली. मोदी यांनी जगभरात १८ संसदीय भाषणं दिली आहेत. या वर्षात अनेक जागतिक नेत्यांनी आणि प्रभावशाली व्यक्तींनी प्रधानमंत्री मोदी यांची सचोटी आणि त्यांचा प्रभाव यांविषयी कौतुकोद्गार काढले आहेत.)*

*//<><><><><>//*